मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# संदीप वाघेरे ठरले सर्वात श्रीमंत उमेदवार

## महापालिका निवडणुकीत कोट्यधीशांची गर्दी, अजित पवार गटाचा उमेदवार आघाडीवर

**पिंपरी | प्रतिनीधी**

महापालिका निवडणुकीसाठी उमेदवारी अर्जासोबत सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रांतून शहरातील कोट्यधीश उमेदवारांची नावे समोर आली आहेत. यामध्ये प्रभाग क्र. २१ मधील राष्ट्रवादी (अजित पवार)चे उमेदवार संदीप वाघेरे तब्बल ३७० कोटींहून अधिक मालमत्तेसह शहरातील सर्वाधिक श्रीमंत उमेदवार ठरले. त्यांच्या पाठोपाठ याच पक्षाचे प्रभाग क्र. २० मधील उमेदवार योगेश बहल १९३ कोटींच्या मालमत्तेसह कोट्यधीश उमेदवारांच्या यादीत आघाडीवर आहेत.



राष्ट्रवादीचे प्रभाग क्र. २१ मधील उमेदवार संदीप वाघेरे यांनी निवडणूक आयोगाकडे सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रात ३७० कोटींची स्थावर व जंगम मालमत्ता नमूद आहे. यामध्ये त्यांच्यासह पत्नीकडे मिळून १६९९ ग्रॅम सोने आणि ३७०० ग्रॅम चांदीचे दागिने आहेत. प्रभाग क्र. २० मधील याच पक्षाचे योगेश बहल यांच्या प्रतिज्ञापत्रात १९३ कोटींची मालमत्ता नमूद आहे. त्यांच्या स्वतःच्या नावे मर्सिडीज बेंज, मुलीच्या नावे रेंज रोव्हर आणि मर्सिडीज-जी, तर मुलाच्या नावे मॉरिस गॅरेज अशा महागड्या मोटारी आहेत.

भाजपच्या पिंपळे सौदागर रहाटणी प्रभाग क्र. २८ मधील कुंदा भिसे यांनीही श्रीमंत उमेदवारांच्या यादीत स्थान मिळविले आहे. त्यांच्याकडे १०४ कोटींची स्थावर व जंगम मालमत्ता आहे. याच प्रभागातील भाजपचे दुसरे उमेदवार शत्रुघ्न काटे यांच्याकडे ५८ कोटींची मालमत्ता आहे, तर याच प्रभागातील राष्ट्रवादी (अजित पवार) पक्षाच्या उमेदवार शीतल काटे यांच्याकडे १४ कोटींची मालमत्ता आहे. त्यांच्याकडे ४०० ग्रॅम सोने व ५०० ग्रॅम चांदी असल्याची नोंद आहे.

वाकड-पुनावळे प्रभाग क्र. २५ मधील भाजपच्या उमेदवार रेश्मा भुजबळ यांच्याकडे ५७ कोटींची मालमत्ता आहे. त्यांच्या पतीच्या नावे रेंज रोव्हर, मर्सिडीज बेंझ, फॉर्च्युनर लिजेंडर अशा अलिशान मोटारी आहेत. राम वाकडकर यांच्या प्रतिज्ञापत्रात ५० कोटींची मालमत्ता नमूद आहे.

### खासदारपुत्रांकडे 29 कोटींची मालमत्ता..

» पिंपळे निलख-विशालनगर प्रभाग क्र. २६ मधील भाजपच्या उमेदवार स्नेहा कलाटे यांनी ३५ कोटींची मालमत्ता जाहीर केली आहे. थेरगाव-दत्तनगर प्रभाग क्र. २४ मधून शिवसेनेचे उमेदवार विश्वजीत बारणे यांची २९ कोटींची मालमत्ता आहे. त्यांच्या नावे लेक्सस एलएक्स ६०० व फॉर्च्युनर या आलिशान मोटारींची नोंद आहे. ते खासदार श्रीरंग बारणे यांचे पुत्र आहेत. वाकड-पुनावळे प्रभाग क्र. २५ मधील भाजपचे उमेदवार राहुल कलाटे यांच्याकडे ७३ कोटींची मालमत्ता आहे.

---

# पिंपरीतील व्यापारी म्हणतात “आम्ही भाजपसोबतच”

## प्रभाग क्र.21 मधील भाजपा उमेदवारांच्या पाठीशी व्यापारी वर्गाचा ठाम पाठिंबा

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पिंपरीतील व्यापारी वर्गाने भारतीय जनता पक्षाला उघड पाठिंबा दर्शवला आहे. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी 'मेक इन इंडिया'च्या माध्यमातून विविध धोरणांद्वारे व्यापारी वर्गाला सातत्याने पाठबळ दिले असल्याचे व्यापाऱ्यांनी यावेळी सांगितले. पारदर्शक करप्रणालीमुळे व्यवसाय करणे सुलभ झाले असून, त्यामुळे सरकारने व्यापाऱ्यांना मोठा दिलासा दिला आहे. म्हणूनच आम्ही भाजपसोबत आहोत, असा ठाम विश्वास पिंपरीतील व्यापाऱ्यांनी व्यक्त केला.



पिंपरी गाव, वैभव नगर, मिलिंद नगर, अशोक थिएटर परिसरातील प्रभाग क्रमांक २१ मध्ये भाजपा-आरपीआय (आठवले गट) चे अधिकृत उमेदवार सौ. उषाताई वाघेरे, मोनिका ताई निकाळजे, गणेश ढाकणे आणि नरेश पंजाबी यांनी व्यापारी बांधवांच्या गाठीभेटी घेत थेट संवाद साधला. व्यापाऱ्यांच्या समस्या, अपेक्षा आणि विकासात्मक मुद्द्यांवर सविस्तर चर्चा केली.

प्रभाग क्रमांक २१ मध्ये भाजप उमेदवारांनी प्रचारात आघाडी घेतली असून, 'होम टू होम' प्रचारानंतर आता व्यापारी वर्गाशी थेट संवादावर भर देण्यात येत आहे. यावेळी उपस्थित सर्वच व्यापाऱ्यांनी भाजप उमेदवारांना एकमुखी पाठिंबा दर्शवला असून, भरघोस मताधिक्याने निवडून देऊ, असा विश्वासही उमेदवारांना दिला आहे.

# विदर्भ मित्र मंडळाचा भाजपाला जाहीर पाठिंबा

## आमदार महेश लांडगे यांच्या नेतृत्वावर विश्वास; प्रभाग-5 सह शहरात भाजपाच्या उमेदवारांना फायदा



**पिंपरी | प्रतिनिधी**

भोसरी येथील आळंदी रोडवरील दुर्वांकुर लॉन्स येथे विदर्भ मित्र मंडळाच्या वतीने आयोजित फॅमिली गेट-टुगेदर व स्नेहसंमेलन उत्साहात पार पडले. या स्नेहसंमेलनातून विदर्भवासीयांनी आमदार महेश लांडगे यांच्या सक्षम व विकासाभिमुख नेतृत्वावर विश्वास व्यक्त करत भारतीय जनता पार्टीला जाहीर पाठिंबा दिला.

या कार्यक्रमास कामगार नेते सचिन लांडगे व उद्योजक कार्तिक लांडगे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. तसेच, प्रभाग क्रमांक ५ मधील इच्छुक उमेदवार अनुराधा गोफणे, सागर गवळी, कविता भोंगाळे व जालिंदर शिंदे यांनी उपस्थित राहून नागरिकांशी संवाद साधला.

यावेळी उपस्थित विदर्भवासीयांनी प्रभाग क्रमांक ५ सह संपूर्ण पिंपरी-चिंचवड शहरात भाजपाच्या उमेदवारांना एकमुखी व बिनशर्त पाठिंबा जाहीर केला. आमदार महेश लांडगे यांच्या नेतृत्वाखाली शहरात सुरू असलेली विकासकामे, संघटनात्मक ताकद व सर्वसामान्यांशी असलेला थेट संवाद यामुळेच ही भूमिका घेण्यात आल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.

मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित राहिल्याने परिसरात राजकीय चैतन्याचे वातावरण निर्माण झाले होते. या स्नेहसंमेलनामुळे विदर्भवासीयांचे सामाजिक ऐक्य अधिक बळकट झाले असून 'मिशन-PCMC' अंतर्गत भाजपाच्या संघटनात्मक मजबुतीला नवी ऊर्जा मिळाल्याचे आयोजकांनी सांगितले.

याप्रसंगी कविता भोंगाळे म्हणाल्या की, "आमदार महेश लांडगे यांच्या नेतृत्वाखाली पिंपरी-चिंचवड शहरात सातत्याने विकासाची कामे होत आहेत. विदर्भवासीयांच्या प्रश्नांना न्याय देणारे नेतृत्व म्हणून आम्हाला त्यांच्यावर पूर्ण विश्वास आहे. त्यामुळे आगामी महापालिका निवडणुकीत भारतीय जनता पार्टीला भक्कम पाठिंबा देण्याचा निर्णय आम्ही एकमताने घेतला आहे."

> पिंपरी-चिंचवड शहराच्या सर्वांगीण विकासासाठी आमदार महेश लांडगे यांनी सातत्याने भक्कम व दूरदृष्टीपूर्ण नेतृत्व दिले आहे. रस्ते, पाणी, शिक्षण, आरोग्य आणि सर्वसामान्य नागरिकांच्या मूलभूत प्रश्नांसाठी त्यांनी नेहमीच ठाम भूमिका घेतली. विदर्भवासीयांच्या सामाजिक, शैक्षणिक आणि रोजगाराच्या प्रश्नांबाबतही त्यांचे योगदान उल्लेखनीय आहे. त्यामुळे विदर्भ मित्र मंडळाच्या वतीने आमदार महेश लांडगे यांच्या नेतृत्वावर पूर्ण विश्वास ठेवून भारतीय जनता पार्टीला जाहीर आणि बिनशर्त पाठिंबा देण्याचा निर्णय घेतला आहे. आगामी महापालिका निवडणुकीत प्रभाग क्रमांक ५ सह संपूर्ण पिंपरी-चिंचवड शहरात भाजपाचे उमेदवार मोठ्या मताधिक्याने विजयी होतील, यासाठी विदर्भवासीय एकजुटीने कार्य करतील, असा विश्वास आहे. सर्व विदर्भवासीयांचे आभार व्यक्त करते.
>
> **- कविता भोंगाळे, उमेदवार, भाजपा, प्रभाग- 5.**

# दिव्यांग मतदारांच्या रॅलीतून लोकशाहीचा सशक्त संदेश

## मतदान जनजागृती रॅलीत दिव्यांग बांधवांचा उत्स्फूर्त सहभाग; शहरभर मतदानाबाबत जागृती



**पिंपरी | प्रतिनिधी**

मतदार राजा जागा हो, लोकशाहीचा धागा हो... माझं मत, माझा अधिकार... मतदान हा हक्क आमचा, लोकशाहीचा अभिमान आमचा... या घोषणांच्या गजरात दिव्यांग मतदारांनी लोकशाहीच्या सशक्ततेचा संदेश देत पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने आयोजित मतदान जनजागृती रॅलीत उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या निवडणुकीत मतदानाची टक्केवारी वाढावी यासाठी महापालिका आयुक्त तथा निवडणूक अधिकारी श्रावण हर्डीकर यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर, उपायुक्त अण्णा बोदडे यांच्या अधिपत्याखाली राबविण्यात येत असलेल्या स्वीप कार्यक्रमांतर्गत मतदान जनजागृती उपक्रम शहरातील विविध भागांत राबविण्यात येत आहेत. या अंतर्गत पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने आज दिव्यांग बांधवांच्या सहभागातून भव्य मतदान जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.

महापालिकेच्या अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांच्या प्रमुख उपस्थितीत ही रॅली निगडी प्राधिकरण येथील 'अ' क्षेत्रीय कार्यालय येथून सुरू होऊन बिजली नगर, वाल्हेकर वाडी, चापेकर चौक, चिंचवड मार्गे प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह येथे पोहोचली. रॅलीदरम्यान नागरिकांमध्ये मतदानाबाबत जनजागृती करण्यासाठी विविध घोषणा देण्यात आल्या.

सदर रॅलीचा समारोप चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह येथे करण्यात आला. यावेळी मतदान जनजागृतीसाठी सादर केलेल्या फ्लॅश मॉबने सर्वांचे लक्ष वेधले. तसेच उपस्थितांना, 'आम्ही, भारताचे नागरिक, लोकशाहीवर निष्ठा ठेवून याद्वारे प्रतिज्ञा करतो की, आपल्या देशाच्या लोकशाही परंपरांचे जतन करू आणि मुक्त, निःपक्षपाती व शांततापूर्ण वातावरणातील निवडणुकांचे पावित्र्य राखू. तसेच प्रत्येक निवडणुकीत निर्भयपणे तसेच धर्म, वंश, जात, समाज, भाषा यांच्या विचारांच्या प्रभावाखाली न येता किंवा कोणत्याही प्रलोभनास बळी न पडता मतदान करू,' अशी मतदानाची शपथ देण्यात आली. या रॅलीमध्ये दिव्यांग बांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

> लोकशाही सशक्त करण्यासाठी प्रत्येक मत अत्यंत मौल्यवान आहे. दिव्यांग बांधवांचा मतदान प्रक्रियेत उत्स्फूर्त सहभाग समाजासाठी प्रेरणादायी असून, हा संदेश या रॅलीतून दिला गेला आहे. दिव्यांग बांधवांमुळे ही रॅली यशस्वी झाली आहे.
>
> **– तृप्ती सांडभोर, अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका.**

> पिंपरी चिंचवड शहरात दिव्यांग मतदारांची संख्या मोठी आहे. हे सर्व मतदार प्रत्येक निवडणुकीत केवळ मतदानच करीत नाहीत तर त्यांचे मित्रमंडळी, नातेवाईक आणि आजूबाजूला असणाऱ्या नागरिकांना देखील मतदान करण्यासाठी जनजागृती करीत असतात. मतदानाचे राष्ट्रीय कर्तव्य बजावणाऱ्या दिव्यांग बांधवांचा आदर्श सर्वांनी घ्यावा.
>
> **– प्रफुल्ल पुराणिक, जनता संपर्क अधिकारी, पिंपरी चिंचवड महापालिका**

# महापालिका निवडणूक प्रशासनाचा भोंगळ कारभार चव्हाट्यावर; उमेदवार व मतदार संभ्रमात

## महापालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावरही आवश्यक माहिती वेळेत उपलब्ध करून दिली जात नसल्याने प्रशासन निष्क्रिय असल्याचा ठपका ठेवला जात आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे महापालिकेच्या निवडणूक प्रक्रियेचा कारभार सध्या गंभीर गोंधळात सापडल्याचे चित्र समोर आले आहे. उमेदवारी अर्ज भरणे, छाननी आणि माघारीची प्रक्रिया पूर्ण होऊनही निवडणूक प्रशासनाकडून अद्ययावत व अधिकृत माहिती जाहीर केली जात नसल्याने निवडणूक विभागावर दबाव असल्याची चर्चा सुरू झाली आहे. विभागातील अधिकारी एकमेकांकडे बोट दाखवत असून, निवडणूक प्रमुख असलेले महापालिका आयुक्त नवल किशोर राम या संपूर्ण प्रकाराकडे कानाडोळा करत असल्याचा आरोप होत आहे. परिणामी मतदार, राजकीय पक्ष आणि उमेदवारांमध्ये मोठा संभ्रम निर्माण झाला आहे.



### काटकर म्हणतात, बाबर यांच्याकडे माहिती विचारा

» पालिकेची निवडणूक प्रक्रिया राबविण्याची जबाबदारी असलेले निवडणूक कार्यालयाचे उपायुक्त प्रसाद काटकर यांना विचारणा केली असता त्यांनी माहिती व जनसंपर्क आणि सोशल मीडियाचे प्रमुख तुषार बाबर यांच्याकडून माहिती घ्यावी, असे सांगितले. त्यानंतर बाबर यांच्याशी संपर्क साधला असता, निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडून माहितीच येत नसल्याने वेळेत माहिती देता येत नाही. संबंधित अधिकाऱ्यांकडून माहिती मिळताच तत्काळ जाहीर केली जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

महापालिका निवडणुकीची रणधुमाळी जोरात सुरू असताना निवडणूक विभागाचा भोंगळ कारभार चव्हाट्यावर आला आहे. उमेदवारी अर्ज माघारीनंतर २४ तास उलटून गेले तरी अचूक आणि अंतिम उमेदवार यादी जाहीर करण्यात आलेली नाही. चिन्ह वाटपाची प्रक्रिया पूर्ण होऊनही अंतिम यादी जाहीर न केल्याने प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. महापालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावरही आवश्यक माहिती वेळेत उपलब्ध करून दिली जात नसल्याने प्रशासन निष्क्रिय असल्याचा ठपका ठेवला जात आहे.

निवडणूक विभागाकडून स्पष्ट माहिती मिळणे अपेक्षित असताना, प्रशासनाने अक्षरशः हात वर केल्याचे चित्र आहे. काही अधिकाऱ्यांकडे विचारणा केली असता परस्परविरोधी उत्तरे दिली जात असल्याने निवडणूक अधिकारीच गोंधळात असल्याचे स्पष्ट होते. यामुळे संपूर्ण निवडणूक प्रक्रियेच्या पारदर्शकतेबाबत शंका व्यक्त केली जात आहे.

राजकीय पक्षांनी आपल्या उमेदवारांचे अंतिम नियोजन पूर्ण केले असतानाही प्रशासनाच्या निष्काळजीपणामुळे अनेक उमेदवारांना प्रचाराची दिशा ठरवताना अडचणी येत आहेत. नेमके कोण कोणाच्या विरोधात उभे आहे, कोणत्या प्रभागात किती आणि कोणते उमेदवार रिंगणात आहेत, याबाबत स्पष्टता नसल्याने उमेदवारांमध्ये नाराजी आहे. एकीकडे पारदर्शक निवडणूक प्रक्रियेचे दावे केले जात असताना, दुसरीकडे प्राथमिक माहितीही वेळेवर उपलब्ध न करून देण्याची प्रशासनाची भूमिका संशयास्पद ठरत आहे. लोकशाहीच्या उत्सवातच असा गोंधळ असल्यास निवडणूक प्रक्रियेवर विश्वास कसा ठेवायचा, असा सवाल उपस्थित होत आहे.

### मतदारांमध्येही संभ्रम

» उमेदवारी अर्ज भरणे, छाननी आणि माघारी या सर्व टप्प्यांमध्ये कोणतीही माहिती वेळेवर आणि पूर्ण स्वरूपात जाहीर न केल्याने कोण कोणत्या पक्षातून आणि कोणाच्या विरोधात उभे आहे, हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. त्यामुळे मतदारांमध्येही संभ्रम आहे. प्रचारासाठी उमेदवार प्रत्यक्ष भेट देऊ लागल्यानंतरच मतदारांना उमेदवारांची माहिती मिळत असल्याचे चित्र आहे.

### अनेक निवडणूक निर्णय अधिकारी सुस्त

» पंधरा क्षेत्रीय कार्यालयांसाठी नेमण्यात आलेल्या निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांपैकी अनेक अधिकारी सुस्त असल्याचे समोर आले आहे. काही अधिकारी तर फोन बंद करून बसत असल्याच्या तक्रारी आहेत. त्यामुळे माहिती संकलन आणि जाहीर करण्याची संपूर्ण यंत्रणाच कोलमडल्याचे चित्र असून, याचा थेट परिणाम महापालिका निवडणूक प्रक्रियेवर होत असल्याची तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे.

# दखल घेण्याएवढे शिवसेनेचे नगरसेवक येतील; उद्योगमंत्री उदय सामंत यांचा दावा

## जागावाटपाचा तिढा सुटला, शिवसेना 119 जागांवर पूर्ण ताकदीनिशी मैदानात; महापौर निवडीत 'किंगमेकर' ठरण्याचा उदय सामंतांना विश्वास.

**पुणे | प्रतिनिधी**

युतीतील जागावाटपाचा अध्याय संपला आहे. महापालिका निवडणुकीच्या इतिहासात शिवसेना पहिल्यांदाच ११९ जागांवर निवडणूक लढवत आहे. येत्या १६ जानेवारीला दखल घेण्याएवढे शिवसेनेचे नगरसेवक निवडून येतील आणि पुण्याचा महापौर ठरविताना आम्हाला विश्वासात घ्यावे लागेल असा विश्वास उद्योगमंत्री उदय सामंत यांनी व्यक्त केला.



आज पुण्यात सर्वत्र शिवसेनेचे भगवे वातावरण असून, शिवसेनेने सत्तेच्या माध्यमातून केलेला विकास पुणेकरांपर्यंत आम्ही घेऊन जाणार असल्याचेही सामंत यांनी सांगितले. शिवसेना उमेदवारांच्या प्रचाराचा प्रारंभ शनिवारी ग्रामदैवत कसबा गणपती, श्रीमंत दगडूशेठ गणपती मंदिर येथे आरती करून आणि जैन मंदिर येथे दर्शन घेऊन झाला. त्यानंतरच्या मेळाव्यास शिवसेना नेत्या व विधानपरिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे,

आमदार विजय शिवतारे, शहराध्यक्ष नाना भानगिरे, माजी आमदार रविंद्र धंगेकर, अजय भोसले, आबा बागुल, युवा नेते किरण साळी, रमेश कोंडे आदी पदाधिकारी उपस्थित होते. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पुण्याच्या प्रश्नांची सोडवणूक केल्याने पुणेकरांचा आम्हाला पाठिंबा मिळेल, असा विश्वास व्यक्त करत सामंत म्हणाले, शिवशक्ती, श्रमशक्ती विरोधात धनशक्ती अशी ही लढाई आहे.

संघर्ष सेनेच्या पाचवीला पुजलेला असून, त्यातूनच मोठे काम उभे राहते हा इतिहास आहे. उमेदवारांनी घरोघरी प्रचार करावा, त्यांना ठामपणे सांगा तुमच्या अडचणी शिवसेना सोडवणार आहे. शिवसेनेची खरी ताकद उमेदवारांनी दाखवून दिली पाहिजे. आमच्याकडे एक नगरसेवक असला तरी त्याचे १५० नगरसेवक कसे करावयाचे हे एकनाथ शिंदे यांना माहिती आहे. महापालिका आता शिवसेनेच्या ताब्यात आली पाहिजे.

### विरोधकांचा अपप्रचार जनतेने फेटाळला

» डॉ. नीलम गोऱ्हे म्हणाल्या, लाडकी बहीण योजनेवर विरोधकांचा अपप्रचार जनतेने फेटाळला आहे. निवडणुकीत जनता पुन्हा शिवसेनेला साथ देईल. शिंदे यांची पूर्ण ताकद उमेदवारांच्या पाठीशी आहे. महिलांना पीएमपीत अर्धे तिकीट, प्रत्येक प्रभागात आपला दवाखाना, नवीन धरणे, अपघात-कोंडीमुक्त पुणे, मंदिरांचे संरक्षण ही कामे प्राधान्याने करण्यात येतील.

# काँग्रेस-ठाकरे सेना-मनसे आमने-सामने; पुण्यात 'मैत्रीपूर्ण' लढतींनी राजकारण तापले


## एबी फॉर्मच्या गोंधळाचा परिणाम; 16 ठिकाणी घड्याळ विरुद्ध तुतारी, प्रभागनिहाय लढती ठाम

**पुणे | प्रतिनिधी**

महापालिका निवडणूक लढतीचे चित्र स्पष्ट झाले आहे. भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस एकमेकांविरोधात लढणार आहे. तर जागावाटपाचा समन्वय ढासळल्यामुळे काँग्रेस, शिवसेना (उबाठा) आणि मनसे या मित्र पक्षांमध्ये 41 पैकी 14 प्रभागांत मैत्रीपूर्ण लढत होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. आठ प्रभागांत काँग्रेस, चार प्रभागांत ठाकरे गटाची शिवसेना, तर दोन प्रभागांत मनसेचे चारही उमेदवार एकाच चिन्हावर रिंगणात उतरणार आहेत. तर काँग्रेस आणि ठाकरे शिवसेना 24 जागांवर एकमेकांविरोधात लढणार आहेत, तर शिवसेना-मनसेमध्ये एका प्रभागातील एका जागेवर मैत्रीपूर्ण लढत होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) आघाडीतून बाहेर पडल्याने काँग्रेस आणि ठाकरे शिवसेनेने एकत्र लढण्याचा निर्णय घेतला. शिवसेना-मनसे युती जाहीर झाल्यानंतर शिवसेनेच्या वाट्याला येणाऱ्या काही जागा मनसेला देण्याचे ठरले होते. मात्र, उमेदवारी जाहीर करताना तिन्ही पक्षांनी जादा एबी फॉर्म वाटले. त्यामुळे आघाडीत बिघाडी असल्याचे संकेत आधीच मिळाले होते. त्याचेच परिणाम आता प्रत्यक्षात दिसत आहेत. त्यातून नऊ प्रभागांत काँग्रेस, ठाकरे शिवसेना आणि मनसे या तिन्ही पक्षांचे उमेदवार एकाच मैदानात उतरल्याने 'मैत्रीपूर्ण' लढत रंगणार आहे.

महापालिका निवडणूक लढतीचे चित्र स्पष्ट झाले आहे. भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस एकमेकांविरोधात लढणार आहे. तर जागावाटपाचा समन्वय ढासळल्यामुळे काँग्रेस, शिवसेना (उबाठा) आणि मनसे या मित्र पक्षांमध्ये 41 पैकी 14 प्रभागांत मैत्रीपूर्ण लढत होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.




### एकाच चिन्हावर लढणार आघाडीचे काही उमेदवार

» आघाडी असूनही तिन्ही पक्षांनी आपापल्या उमेदवारांना एकच पक्षचिन्ह मिळावे यासाठी जोरदार प्रयत्न केले. त्यामुळे प्रभाग क्रमांक 4 खराडी-वाघोली, प्रभाग क्रमांक 6 येरवडा-गांधीनगर, प्रभाग 8 औंध-बोपोडी, प्रभाग 13 पुणे स्टेशन-जय जवाननगर, प्रभाग 16 हडपसर-सातववाडी, प्रभाग 18 वानवडी-साळुंखे विहार, प्रभाग 26 घोरपडे पेठ-गुरुवार पेठ, प्रभाग 22 कासेवाडी-डायस प्लॉटमध्ये काँग्रेससह शिवसेना मनसेचे उमेदवार 'पंजा' चिन्हावर लढणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. तर प्रभाग क्रमक 40 कोथरूड येवलेवाडी, प्रभाग क्रमांक 33 शिवणे-खडकवासला, प्रभाग क्रमांक 17 रामटेकडी-माळवाडी व प्रभाग क्रमांक 4 हडपसर-सातववाडी या प्रभागांत ठाकरे शिवसेनेचे उमेदवार 'मशाल' घेऊन मैदानात उतरले आहेत. तर प्रभाग 31 आणि 32 मध्ये मनसेच्या 'इंजिन' या चिन्हावर उमेदवार लढणार आहेत.

### 16 ठिकाणी विरुद्ध लढती ठाम

» दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसकडून आधीच उमेदवारांना एबी फॉर्म वाटप झाले. ज्या ठिकाणी उमेदवारी दिली, तेथे उमेदवारांनी माघार घेण्यास नकार दिला. त्यामुळे 'मैत्रीपूर्ण लढत' या नावाखाली एकमेकांविरोधात रिंगणात उतरण्याचा निर्णय झाला. परिणामी 16 ठिकाणी 'घड्याळ' आणि 'तुतारी' समोरासमोर उभी ठाकणार आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस 138 जागांवर, तर राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्ष 43 जागांवर लढणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

### प्रमुख लढत भाजप विरुद्ध राष्ट्रवादी काँग्रेस

» पुणे महापालिकेत भाजपने राष्ट्रवादी काँग्रेसला प्रमुख विरोधी पक्ष म्हणून जाहीर केले आहे. भाजपने 158 जागांवर तर रिपाइंने 7 जागांवर उमेदवार दिले आहेत. भाजपच्या दोन जागा बिनविरोध निवडल्या आहेत. महापालिका निवडणुकीत दोन्ही राष्ट्रवादी एकत्र लढत आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसने 138 जागांवर उमेदवार उभे केले आहे. तर राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाने 43 जागांवर उमेदवार उभे केले आहेत. काँग्रेसने 91 जागांवर उमेदवार उभे केले आहे. शिवसेना उद्धव ठाकरे गटाने 71 जागांवर तर मनसेने 44 जागांवर उमेदवार उभे केले आहेत. तर शिवसेना शिंदे गटाने 118 जागांवर उमेदवार उभे केले आहेत.

# श्री क्षेत्र कुंडेश्वर मंदिराचा कायापालट होणार; 6 कोटी रुपये खर्चून मिळणार 'असा' लुक

## श्रीक्षेत्र कुंडेश्वर मंदिराला मिळणार पुरातन स्वरूप; 6 कोटींच्या विकासकामांचे माजी आमदार दिलीप मोहिते पाटील यांच्या हस्ते भूमिपूजन.

**पुणे | प्रतिनिधी**

खेड तालुक्यातील कोहिंडे बुद्रुक येथील श्रीक्षेत्र कुंडेश्वर मंदिर परिसराला पुरातन कालीन स्वरूप प्राप्त करून देण्यासाठी मोठ्या प्रमाणावर विकासकामे हाती घेण्यात आली असून, त्याअंतर्गत सुमारे 6 कोटी रुपयांच्या विविध विकासकामांचे भूमिपूजन माजी आमदार दिलीप मोहिते पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

मोहिते पाटील म्हणाले की, कुंडेश्वर, चक्रेश्वर, शंभू महादेव मंदिर, भामेश्वर ही गिरीस्थाने असून, या सर्व मंदिरांना पुरातन काळापासून धार्मिक व ऐतिहासिक महत्त्व आहे. तसेच सिद्धेश्वर, काळेश्वर, शैनेश्वर व सोमेश्वर ही जमिनीवर असलेली भगवान शंकराची हेमाडपंथीय मंदिरे असून, त्यांची स्थापत्यरचना वैशिष्ट्यपूर्ण आहे.या ऐतिहासिक व धार्मिक वारशाचे जतन व्हावे, या दृष्टीने श्री क्षेत्र कुंडेश्वर परिसराचा विकास पुरातन कालीन स्वरूप जपणाऱ्या पद्धतीने करण्यात येत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या विकासकामांत दोन दीपमाळांची उभारणी, नेवासा दगडातील पायऱ्या, दगडी रस्ता, दगडी फरशी ब्लॉक्स, संरक्षक भिंत (कंपाउंड) आदी कामांचा समावेश आहे.

याशिवाय, श्री क्षेत्र कुंडेश्वर येथे सुमारे 3 कोटी रुपये खर्चून रस्ता रुंदीकरणाचे काम सध्या सुरू असल्याची माहितीही त्यांनी दिली. कार्यक्रमाच्या सुरुवातीस श्री क्षेत्र कुंडेश्वर येथे घडलेल्या दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेल्या महिलांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.या कार्यक्रमास पुणे जिल्हा दूध संघाचे संचालक अरुण चांभारे, कुंडेश्वर देवस्थानचे अध्यक्ष सखाराम खेंगले, खेड तालुका राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे अध्यक्ष जयसिंग दरेकर, पश्चिम विभाग अध्यक्ष अमोल पाणमंद, देवस्थानचे खजिनदार संजय रौंधळ, खेड तालुका राष्ट्रवादी काँग्रेसचे उपाध्यक्ष हिरामण रौंधळ, संचालक लक्ष्मण घोलप, भीमाजी कचाटे, आनंदराव कचाटे, संभाजी कुडेकर, सत्यवान पाणमंद, रामदास खेंगले, चिंतामण शिंदे, बबन शिंदे, पांडुरंग बच्चे, देवतोरणे ग्रामपंचायतीच्या सरपंच आरती शिंदे, चेअरमन अनिल डांगले, पंडित रौंधळ, विजय करंडे,

रामदास सावंत, हिरामण कंद, सत्यवान वाळुंज, अतुल आहेरकर, सौरभ कोळेकर, माजी सरपंच मंगल भांगे, राजश्री ढोरे यांच्यासह परिसरातील ग्रामस्थ, पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रामदास खेंगले यांनी केले तर गणेश आहेरकर यांनी आभार मानले.



### पाईट गणातून पल्लवी दरेकर

» याच कार्यक्रमात माजी आमदार दिलीप मोहिते पाटील यांनी पाईट पंचायत समिती गणातून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने पल्लवी जयसिंग दरेकर यांची अधिकृत उमेदवारी जाहीर केली. जयसिंग दरेकर हे प्रत्येक विषयाचा सखोल अभ्यास करून काम करणारे प्रामाणिक कार्यकर्ते असून, त्यांच्या माध्यमातून परिसरात कोट्यवधी रुपयांची विकासकामे मार्गी लागल्याचे मोहिते पाटील यांनी नमूद केले.